अहवाल दि. 29/09/2022

आज दिनांक 29/09/2022 रोजी कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात 'मराठी राजभाषा पंधरवडा' या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या प्रसंगी कार्यक्रमासाठी मुगटराव साहेबराव काकडे महाविद्यालय सोमेश्वरनगर बारामती या महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. प्रविण ताटेदेशमुख उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ. संजय चाकणे सर यांनी भूषविले तर प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. राजाराम गावडे सर यांनी केले.

यावेळी प्रा. ताटे-देशमुख यांनी "साहित्य, समाज आणि संस्कृती" या विषयावर मौलिक मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना त्यांनी इंदापूर महाविद्यालयाचा वाटा अनमोल आहे असा महाविद्यालयाचा उल्लेख केला.

मराठी राजभाषा पंधरवाडा साजरा करावा लागतो कारण काही गोष्टीच्या मुळाशी जाणे गरजेचे असते. एखादा दिन साजरा करणे म्हणजे त्याकडे विशेष लक्ष देणे स्त्रीला व्यक्ती म्हणून स्थान देणे गरजेचे आहे. यासाठी आपण महिला दिन साजरा करतो.

जपान हा प्रगत देश आहे परंतु कुटुंबव्यवस्थेकडे दुर्लक्ष झाल्यामुळे कुटुंब उद्ध्वस्त होण्याच्या मार्गावरती होते अशा दुर्लक्ष झालेल्या जपानमध्ये कुटुंबदिन गोष्टीकडे लक्ष देण्यासाठी साजरा करतात.

"साहित्य, समाज आणि संस्कृती" एकरूप आहेत. एखाद्या भाषेचे श्रेष्ठत्व साहित्यावर अवलंबून असते. साहित्याचा अभ्यास म्हणजेच संस्कृतीचा अभ्यास प्रत्येक काळातील साहित्यात मौलिक असे विचार असतात. उदा० तुकारामाचे अभंग, महानुभावपंथीय वाङ्मय, लिळाचरित्र, यावेळी बोलताना तुकाराम, कुसुमाग्रज तसेच समाजप्रबोधनकार यांचे उदाहरण सहित विचार मांडले. भाषा जिवंतपणा बोली भाषेतून येतो. बोली भाषा समृद्ध करतात.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. राजाराम गावडे सर यांनी केले यावेळी बोलताना 'मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी शासनाने प्रयत्न केला आहे. मराठी भाषेचे संवर्धन जतन झाले पाहिजे असे भाषेचे महत्व सांगितले.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नवनाथ गाडे सर यांनी केले तर आभार प्रा. सारिका पाटील यांनी मानले यावेळी प्रा. बिराजदार सर, कला शाखा प्रमुख प्रा. भिमाजी भोर सर इतर प्राध्यापक वर्ग व मान्यवर कार्यक्रमासाठी उपस्थीत होते.

---x---

प्रा.डॉ.राजाराम प्रभाकर गावडे
मराठी विभाग प्रमुख,
कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय
इंदापूर,जि.पुणे, 413 106

प्रा. सारिका पाटील
मराठी विभाग